(९८)

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडे
सोपविण्यात आलेल्या प्रकल्पांचे
संकल्पन व संकल्पचित्र प्रस्तावासंदः

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण मसंस ०३०८/(१७३/२००८)/मो.प्र.१.
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक - ०८/०४/२००८.

662
2/4/06

संदर्भ : १) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २००१/६२/(६९०/२००१)/मोप्र-२,
दिनांक १५/११/२००१.
२) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ११०४/(४९९/२००४)/मोप्र-१,
दिनांक ०९/१२/२००४.

प्रस्तावना :-

जलसंपदा विभागांतर्गत मोठया, मध्यम, लघु/जलविद्युत प्रकल्पाचे संकल्पन व रेखाचित्रे तयार करणे बाबतची पद्धत व त्यास मंजुरी प्रदान करण्याबाबतच्या सविस्तर सूचना उपनिर्दीष्ट संदर्भिय शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी निर्गमित केलेल्या संकल्पन टिपण्या व रेखाचित्रे यांना संबंधित क्षेत्रिय मुख्य अभियंता स्तरावरुन मंजुरी न घेता सदरची रेखाचित्रे कार्यक्षेत्रावर बांधकामासाठी वापरण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून ही बाब गंभीर आहे. तसेच पाटबंधारे प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत प्रस्ताव व्यय अग्रक्रम समितीपुढे सादर करण्यात आले असता संकल्पचित्रातील बदलामुळे होणा-या अतिरिक्त खर्चास सक्षम अधिका-याची मान्यता वेळच्यावेळी घेण्यात येत नाही याबाबत समितीने असमाधान व्यक्त केले आहे. या बाबी विचारात घेता त्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

परिपत्रक :-

१ संदर्भिय परिपत्रक दि. १५/११/२००१ व दि. ९/१२/२००४ नुसार दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२ मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने संकल्पन टिपणी व रेखाचित्रे निर्गमित करतांना रेखाचित्रावर खालीलप्रमाणे टिपण ठळक अक्षरात लिहिण्यात यावी. Note: This drawing should not be used for execution till approval from the competent authority is obtained.

३ मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने निर्गमित केलेल्या संकल्पन टिपणी व रेखाचित्रे यांना संबंधित मुख्य अभियंता स्तरावर मंजुरी प्राप्त झाल्याशिवाय पुढील भागाची संकल्पन टिपणी व रेखाचित्रे कोणत्याही परिस्थितीत निर्गमित करु नयत.

४ संकल्पचित्रातील बदलामुळे घटकांच्या किंमतीत लक्षणीय वाढ होत असल्यास सदर वाढीच्या अनुषंगाने होणा-या अतिरिक्त खर्चाच्या प्रस्तावास सक्षम अधिका-याची मान्यता घेतल्यानंतरच सुधारित संकल्पचित्रास मुख्य अभियंता

यांनी तांत्रिक मान्यता द्यावी. अतिरिक्त खर्चाची मान्यता Exess Note अथवा सुधारित प्रशासकीय मान्
करण्यात यावी. सदर अभियांत्रिकी बदलामुळे होणा-या अतिरिक्त खर्चाचा सुधारित अंदाजपत्रकात समावेश क

५ मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने तयार केलेल्या संकल्पन टिपण्या व रेखाचित्रावर काही बदल सुचवावयाचे अस
ते संबंधीत मुख्य अभियंता स्तरावरुन सुचविण्यात यावेत.

६ वरील मान्यते अभावी काम करणारे व त्याचे भुगतान करणारे संबंधित कार्यकारी अभियंता यांना सदर अनिय
जबाबदार धरण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ता.ना. मुंडे)
शासनाचे उप सचिव

प्रत -
सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ, जलसंपदा विभाग (सर्व),
महासंचालक, मेरी, नाशिक.
मुख्य अभियंता व पदसिध्द सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व),
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, क्षत्रीय कार्यालये (सर्व),
अधीक्षक अभियंता व पदसिध्द उप सचिव , जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व),
अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग, क्षेत्रीय कार्यालये (सर्व),
आपल्या अखात्यारीतील सर्व क्षेत्रीय अधिका-यांना आपल्या स्तरावर आवश्यक सूचना द्याव्यात.
जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी व तांत्रिक कार्यासने,
उप अभियंता (मोप्र-१) संग्रहार्थ.
मोप्र-१ कार्यासन संग्रहार्थ

अधीक्षक अ
म. सं. मं. (वि

४९२
क्रमांक/घरीक्षक/(५/२००८)/वि.मंडे/प्रशा/४३४ २५/०८ जावक -
३०/७/०८
प्रत कार्यकारी अभियंता सं. नि. वि. हे
क्र. १, २, ३ व ४ मसंसं नाशिक यांना माहिती व
कार्यवाहीसाठी.

अधीक्षक अ
म. सं. मं. (

C:\MADYAVARTISANKALPCHITRA.doc